नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 04/09/2021 (शनिवार)
(दुपार)

---

## रामटेक येथील हातभट्टी दारू गाळणारा कुख्यात गुन्हेगार संजय धुर्वे याला MPDAकायदयान्वये नागपूर कारागृहात डांबण्यात आले

पोलीस स्टेशन रामटेक नागपूर ग्रामीण हद्दीतील हातभट्टी दारू काढणारा व अवैध गावठी दारू विक्री करणारा इसम संजय हरिदास धुर्वे वय 29 वर्षे रा. काचुरवाही यास मा. जिल्हादंडाधिकारी नागपूर यांचे आदेशाने MPDA कायदयान्वये मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे 01 वर्षे कालावधी साठी दिनांक 03.09.2021 रोजी स्थानबध्द केले आहे.

स्थानबध्द इसम संजय हरिदास धुर्वे रा. काचुरवाही हा मागील 4 ते 5 वर्षा पासुन हातभट्टी लावून मोहाफुलाची गावठी दारू गाळुन काचुरवाही गावात व आजुबाजुच्या परिसरातील गावे खोडगांव, किरणापुर, चोखाळा, मसला, खंडाळा, हातोडी या भागात अवैध दारूची विक्री करत होता. तो एक सराईत हातभट्टीवाला असुन सन 2017 पासुन सतत हातभट्टी लावुन गावठी दारू निर्मीती व विक्री करीत होता. रामटेक पोलीसांनी त्याच्या अवैध अड्डयांवर वारंवार रेड करून कायदेशीर कारवाही केली व गुन्हे दाखल केले आहेत. तसेच वेळोवेळी त्याच्यावर प्रतिबंधक कार्यवाही केली तरी सुध्दा त्यांचेमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा झाली नाही. त्यामुळे त्याच्यावर MPDA कायदयांतर्गत कारवाही करण्याबाबत पोलीस स्टेशन रामटेकचे ठाणेदार श्री प्रमोद मकेश्वर यांनी पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचेमार्फत जिल्हाधिकारी नागपूर यांना प्रस्ताव सादर केला.

संजय धुर्वे हा त्याच्या साथीदारासह वाहनाव्दारे दारूची वाहतुक करतो. तसेच वाहने अतिवेगाने व निष्काळजीपणे चालवतो त्यामुळे रस्त्याने येणारे व जाणारे परिसरातील आणि इतर लोकांच्या जीवीतास धोका निर्माण झालेला होता. सदर व्यक्तीचे या वर्तणामुळे त्यास अवैद्य पैसा मिळविण्याचे साधन निर्माण झाले असे वाटत असल्याने तो काचुरवाही गावामध्ये नियमित अवैद्यरित्या दारूची विक्री करीत होता. त्यामुळे ग्राम काचुरवाहीला लागून असलेल्या परिसरातील 4 ते 5 गावातील तरूण मुले, व्यक्ती दारूच्या आहारी जावुन व्यसनाधीन झालेले आहेत. तसेच व्यसनी व्यक्तीमुळे तरूण पिढीचे कुटुंबे व्यसनाधीन होवुन कुटुंबातील मुली, स्त्रियांना त्रास सहन करावा लागत आहे. व्यसनी ईसमांमुळे परिसरातील स्त्रिया, मुलीचे छेडखानीचे प्रमाण वाढले असल्याने सार्वजनिक व्यवस्थेत बाधा उत्पन्न झाली आहे. संजय धुर्वे हा महिलांसोबत असभ्य वर्तन करण्याचे सवयीचा होता. त्याचेविरुध्द रामटेक पोलीसात विनयभंगाच्या अनेक तक्रारी दाखल आहेत. संजय धुर्वे अतिशय आडदांड प्रवृत्तीचा आहे. स्थानिक प्रशासन ग्रामपंचायतचे पदाधिकारी यांनी त्याचे दारुबंदी विषयी ग्रामस्तरावर कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला तर तो ग्रामपंचायत पदाधिकारी यांचेवर साथीदारांसह हल्ला चढवून त्यांना नुकसान पोहचवायचा. काचुरवाही गावातील महिला मंडळ दारुबंदी विरोधात कार्यवाही करीत असल्यास तो महिलांवर हल्ले करायचा. एकंदरीत परिस्थीती लक्षात घेता नागपूर ग्रामीण चे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली संजय धुर्वे यांचे विरूध्द MPDA कायदयांतर्गत कार्यवाही करून त्याला मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे डांबले आहे. अश्याप्रकारे कारवाई करण्यासंदर्भात नागपूर ग्रामीण पोलीसांनी मोहिम उघडली असून अवैध दारुविक्री करणाऱ्यांवर अश्याचप्रकारे कडक कारवाई करण्याचा ईशारा पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला यांनी दिला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, श्री. संजय पुरंदरे पोलीस उपअधीक्षक (गृह), श्रीमती नयन आलुरकर उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक प्रमोद मकेश्वर ठाणेदार रामटेक, नायक पोलीस दिनेश आधापुरे, महिला नायक पोलीस नम्रता बघेल, पोलीस शिपाई आकाश सिरसाठ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर